## आजचे पंचांग

दिनांक : ५ सप्टेंबर २०२६ वार : शनिवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : नवमी तिथी (रात्री ०९:५३ पर्यंत) त्यानंतर दशमी तिथी नक्षत्र : मृगशीर्ष नक्षत्र (रात्री ०९:३० पर्यंत) त्यानंतर आर्द्रा नक्षत्र योग : वज्र योग (दुपारी १२:४६ पर्यंत) त्यानंतर सिद्धि योग करण : तैतुला करण (सकाळी ११:०४ पर्यंत) त्यानंतर गराजा करण चंद्र राशी : वृषभ राशी

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## आळंदीत श्री कृष्ण जन्मोत्सव

**पुणे :** भगवान श्री कृष्ण जन्मोत्सव व संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आज, ४ सप्टेंबर रोजी आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज (माऊली) मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यानिमित्त माऊली मंदिराच्या गाभाऱ्यासह परिसरात नयनरम्य व आकर्षक फुलसजावट करण्यात आली असून परिसर माऊलींच्या गजराने दुमदुमला आहे. आज पहाटे ३:३० वाजता घंटानादाने दिवसाची सुरुवात झाली.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ वर्ष - १ अंक - ३३८ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### डीजे-लेझरवर कारवाईला फडणवीस सरकार का घाबरतंय? संजय राऊतांचा थेट सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई/ वृत्तसंस्था :

सणासुदीच्या काळात उच्च क्षमतेच्या डीजे साऊंड सिस्टिम आणि लेझर लाइट्सच्या वापराबाबत राज्य सरकारने ठोस आणि सर्वसमावेशक धोरण जाहीर करावे, अशी मागणी शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी केली आहे. पुण्यात मोठ्या आवाजाच्या साऊंड सिस्टिमविरोधात भूमिका घेणारे कार्यकर्ते विद्यानंद बापट यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राऊत यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली.

डीजे आणि लेझरवर कारवाई करण्याचे धाडस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात नाही, असा थेट आरोप राऊत यांनी केला. काही शहरांमध्ये बंदी घालून हा प्रश्न सुटणार नाही, कारण ध्वनी आणि प्रकाश प्रदूषणाचा मुद्दा सार्वजनिक आरोग्याशी संबंधित आहे, असे त्यांनी म्हटले. नागपूर पोलिसांनी आगामी सणासुदीच्या काळात उच्च क्षमतेच्या साऊंड सिस्टिम्स, बीम्स आणि लेझर लाइट्सच्या वापरावर बंदी घालण्याचा आदेश जारी केला आहे. या निर्णयाचे स्वागत करताना राऊत यांनी हा निर्णय केवळ नागपूरपुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रासाठी धोरणात्मक पातळीवर लागू करण्याची मागणी केली. पुण्यात गणेशोत्सवाच्या काळात डीजेच्या वाढत्या आवाजाविरोधात नागरिक आणि कार्यकर्त्यांनी आंदोलन केले होते. त्यानंतर बापट यांच्यावर झालेल्या हल्ल्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

जर सरकार लोकांच्या भावनांचा आदर करते, तर लोकांच्या मागणीनुसार कारवाई करण्यास सरकार का घाबरत आहे? असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला. डीजेचा आवाज, लेझर लाइट्स आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आता केवळ उत्सवापुरता राहिलेला नसून, प्रशासनाच्या इच्छाशक्तीचीही परीक्षा ठरत आहे. त्यामुळे राज्य सरकार यावर व्यापक धोरण कधी जाहीर करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सरकारी शाळांत 'नो एन्ट्री'चा मार्ग मोकळा? निरीक्षणावर निर्बंध, मग पालकांनी तक्रार कुठे करायची?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

नवी दिल्ली : सरकारी शाळांमध्ये बाहेरील व्यक्तींना प्रवेश, पाहणी, छायाचित्रण, चित्रीकरण, मुलाखत किंवा थेट प्रक्षेपण करण्यासाठी पूर्वपरवानगी बंधनकारक करणाऱ्या राजस्थान आणि उत्तर प्रदेशातील आदेशांविरोधातील जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. न्यायालयाने १ सप्टेंबरच्या आदेशात कलम ३२ अंतर्गत दाखल याचिकेवर सुनावणी घेण्यास इच्छुक नसल्याचे स्पष्ट केले. कायदेशीरदृष्ट्या हा आदेश विशिष्ट याचिकेपुरता असला, तरी सरकारी शाळांमधील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि पालकांच्या तक्रारींच्या अधिकाराबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

राजस्थानच्या माध्यमिक शिक्षण संचालकांनी १६ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, सरकारी शाळेत बाहेरील व्यक्तीला प्रवेश करण्यासाठी मुख्याध्यापकांची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. एवढेच नव्हे, तर छायाचित्रण, चित्रीकरण, मुलाखत, ध्वनिमुद्रण आणि थेट प्रक्षेपणासाठीही लेखी परवानगी घ्यावी लागणार आहे. सरकारी शाळांमध्ये गैरप्रकार रोखण्यासाठी किंवा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी काही नियम आवश्यक असू शकतात; मात्र त्याच नियमांचा वापर शाळेतील वास्तविक परिस्थिती बाहेर येऊ नये यासाठी झाला तर प्रश्न अधिक गंभीर बनतो. कारण सरकारी शाळा ही एखाद्या अधिकाऱ्याची किंवा प्रशासनाची खासगी मालमत्ता नाही. ती करदात्यांच्या पैशातून चालणारी सार्वजनिक व्यवस्था




आहे. शाळेच्या इमारतीची अवस्था काय आहे? स्वच्छतागृहे आहेत का? पिण्याचे पाणी उपलब्ध आहे का? शिक्षकांची पदे रिक्त आहेत का? विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक सुविधा मिळतात का? मध्यान्ह भोजनाची गुणवत्ता कशी आहे? अशा प्रश्नांची उत्तरे केवळ सरकारी अहवालांमधून नव्हे, तर प्रत्यक्ष पाहणीतूनही समोर येतात.

राजस्थानमध्ये 'शाळा दुरुस्त करा' मोहिमेअंतर्गत सरकारी शाळांची पाहणी करणाऱ्या कार्यकर्त्यांवर हल्ला झाल्याची पार्श्वभूमीही या निर्णयाला अधिक संवेदनशील बनवते. प्रशासनाने सुरक्षा आणि विद्यार्थ्यांच्या गोपनीयतेचे कारण देत प्रवेशावर नियंत्रण ठेवणे समजण्यासारखे असले, तरी परवानगी कोण देणार आणि परवानगी नाकारली तर त्याविरोधात पालक किंवा नागरिकांनी कुठे दाद मागायची? हा मूलभूत प्रश्न अनुत्तरित राहतो.

सरकारी शाळेतील एखादी गंभीर समस्या पालकांनी निदर्शनास आणून दिली आणि प्रशासनाने ती दुर्लक्षित केली, तर बाहेरील स्वतंत्र निरीक्षक, पत्रकार, सामाजिक संस्था किंवा नागरिकांनी वस्तुस्थिती तपासण्याचा मार्गच बंद झाला तर सरकारी यंत्रणेच्या उत्तरदायित्वाची कसोटी कोण घेणार?

सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली म्हणजे देशभरातील प्रत्येक सरकारी शाळेत कोणालाही प्रवेशबंदी करण्याचा सार्वत्रिक आदेश न्यायालयाने दिला आहे, असा अर्थ मात्र काढता येणार नाही. पण या निर्णयामुळे राज्य सरकारांच्या अशा प्रवेश-नियंत्रणाच्या आदेशांना सध्या कायदेशीर आव्हान मिळालेले नाही. त्यामुळे आता खरी कसोटी सरकारची आहेही परवानगी व्यवस्था विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आहे की सरकारी व्यवस्थेवर प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी? सरकारी शाळांमध्ये अनधिकृत हस्तक्षेप रोखायलाच हवा; पण त्याचवेळी अधिकृत यंत्रणेलाही सार्वजनिक उत्तरदायित्वापासून मुक्त करता कामा नये. कारण शाळेच्या दारावर 'नो एन्ट्री'चा फलक लावणे सोपे आहे; पण त्या दाराच्या आत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या नावाखाली नेमकं काय मिळतंय, याचा हिशेब जनतेला देणे ही सरकारची खरी जबाबदारी आहे.

## सचिन शर्मा फक्त प्यादा? दिल्ली पोलिसांच्या कारवाईमागे 'वरचा हात' कोणाचा, अमित शाहांवरही प्रश्नचिन्ह!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

दिल्लीतील संसद मार्ग पोलीस ठाण्याबाहेर शुक्रवारी, ४ सप्टेंबर रोजी कॉकरोज जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे दिल्ली पोलिसांच्या भूमिकेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. स्वतंत्र भारडजविरोधात कारवाईची मागणी करत आंदोलन करण्यात आले. या प्रकरणात डीसीपी सचिन शर्मा यांच्यावरही कारवाईची मागणी करण्यात आली असून, कॉकरोज जनता पार्टीचे संयोजक अभिजीत दिपके यांनी त्यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या काही व्हिडिओंच्या आधारे भारडजने आंदोलक विद्यार्थिनी निशू आझाद यांच्या वडिलांवर हल्ला केल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणात कठोर कारवाई का झाली नाही, असा सवाल



आंदोलकांकडून उपस्थित केला जात आहे. दिपके यांनी दिल्ली पोलिसांवरच पक्षपातीपणाचा आरोप करत, दोन महिन्यांनंतरही संबंधित व्यक्ती मोकाट फिरत असल्याचा दावा केला आहे.

मात्र या संपूर्ण प्रकरणातील सर्वात मोठा प्रश्न केवळ एका डीसीपीच्या भूमिकेपुरता मर्यादित आहे का? सचिन शर्मा हे निर्णय घेणारे आहेत की केवळ आदेश पाळणारे प्यादे? जर पोलिसांवर राजकीय दबाव असल्याचे आरोप होत असतील, तर त्या दबावाचा स्रोत कोणता, याची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे.

मात्र दिल्ली पोलीस केंद्रीय गृह मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असल्याने, दिल्ली पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत अंतिम राजकीय जबाबदारी कोणाची? हा प्रश्न नक्कीच विचारता येतो.

जर एखाद्या पीडित कुटुंबाला न्यायासाठी पोलीस ठाण्याच्या दारात आंदोलन करावे लागत असेल, तर ही केवळ एका अधिकाऱ्याची समस्या राहत नाही; ती संपूर्ण कायदा-सुव्यवस्था व्यवस्थेच्या विश्वासार्हतेची परीक्षा बनते.

सचिन शर्मा दोषी आहेत की नाही, हे तपासातून ठरेल. पण जर पोलीस यंत्रणा राजकीय प्रभावाखाली काम करत असल्याचा आरोप खरा असेल, तर प्याद्यावर कारवाई करून भागणार नाही निर्णय कुठून येतात, हेही जनतेसमोर यायला हवे.

## उद्धव ठाकरेंची 'शिवभोजन' योजना, फडणवीस सरकारचा ७२ कोटींचा आधार! विरोधाच्या राजकारणापेक्षा गरिबांच्या ताटाला सरकारची पसंती?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई / प्रतिनिधी

सत्तेत आल्यानंतर पूर्वीच्या सरकारच्या योजनांवर टीका करणाऱ्या महायुती सरकारने आता तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या 'शिवभोजन' योजनेसाठी तब्बल ७२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे राजकीय मतभेद बाजूला ठेवून गरिबांच्या ताटासाठी ही योजना सुरू ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचे चित्र आहे. मात्र याच निर्णयामुळे एक वेगळाच राजकीय प्रश्नही निर्माण झाला आहेउद्धव ठाकरे सरकारची योजना चुकीची होती, तर फडणवीस सरकारच्या अर्थ विभागाने त्यासाठी कोट्यवधींचा निधी का मंजूर केला? २६ जानेवारी २०२० रोजी सुरू झालेल्या या योजनेत गरीब आणि गरजू नागरिकांना अवघ्या १० रुपयांत दोन चपाती, भाजी, वरण आणि भात दिला जातो. केंद्रचालकांना सरकारकडून अनुदान दिले जाते. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी शिवभोजन योजनेसाठी १२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, त्यापैकी वित्त विभागाने ७२ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. यातील ३२.९५ कोटी रुपये मार्च २०२६ अखेरची प्रलंबित देयके आणि ३६.३६ कोटी रुपये एप्रिल व मे महिन्यात प्रत्यक्ष वितरित केलेल्या थाळ्यांच्या अनुदानासाठी असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. म्हणजेच केंद्रचालकांचे थकीत पैसे भागवण्यासाठीही सरकारला आता निधी सोडावा लागत आहे. अनुदान रखडल्याने काही केंद्रे बंद होण्याच्या मार्गावर होती. त्यामुळे नागपूर विभागातील केंद्रचालकांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली होती. त्यानंतर सरकारने निधी उपलब्ध करून दिला. मात्र राजकारणाचा विरोधाभास इथेच आहे. ज्या उद्धव ठाकरे सरकारच्या योजनांवर महायुती अनेकदा टीका करते, त्याच सरकारची लोककल्याणकारी योजना सत्तेत आल्यानंतर टिकवण्यासाठी फडणवीस सरकारचा अर्थ विभाग पैसा देत आहे. याचा अर्थ एकचराजकीय श्रेय कोणाचेही असो, गरीबांच्या ताटात जेवण पोहोचत असेल तर योजना बंद करण्यापेक्षा ती सुधारून सुरू ठेवणेच सरकारला भाग पडते.

## 'काँग्रेस जिताओ पार्टी' म्हणणाऱ्या फडणवीसांना सीईटी डेटा लीकचे उत्तर द्यावे लागणार? ४ लाख ५९ हजार विद्यार्थ्यांचा गोपनीय डेटा धोक्यात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई / प्रतिनिधी :

विरोधकांवर राजकीय टीका करत कॉकरोज जनता पार्टीला 'काँग्रेस जिताओ पार्टी' असे संबोधणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आता महाराष्ट्राच्या शिक्षण प्रशासनासमोरील गंभीर प्रश्नांवर काय भूमिका घेणार, हा सवाल उपस्थित होत आहे. महाराष्ट्र सामायिक प्रवेश परीक्षा म्हणजेच सीईटी कक्षाशी संबंधित तब्बल ४ लाख ५९ हजार ४९३ विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती लीक झाल्याची घटना समोर आली असून, विद्यार्थ्यांच्या गोपनीयतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

१ सप्टेंबर रोजी नारायण शिंगारे यांनी डेटा लीकची माहिती सीईटी कक्षाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर संगणक प्रणालीची फॉरेन्सिक तपासणी करण्यात आली. त्यानंतर प्रशासनाने मुंबईतील आझाद मैदान पोलिसांना पत्र देऊन कायदेशीर कारवाईची मागणी केली. ४ सप्टेंबर रोजी आमदार रोहित पवार यांनी सीईटी कक्षाला भेट देत या प्रकरणाचा आढावा घेतला आणि पोलिसांत तक्रार करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

मात्र प्रश्न एवढाच नाही की डेटा कोणी लीक केला? त्याहून मोठा




प्रश्न आहेइतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचा संवेदनशील डेटा बाहेर जाण्यापूर्वी सरकारी यंत्रणेला त्याचा सुगावा का लागला नाही?

राज्याच्या शिक्षण व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणाऱ्या प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या माहितीच्या सुरक्षेसाठी कोणत्या यंत्रणा उभारल्या होत्या? डेटा सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी कोणाची होती? सुरक्षा व्यवस्था अपयशी ठरली असेल, तर त्याची प्रशासकीय जबाबदारी कोण स्वीकारणार?

राजकारणात विरोधकांना टोपणनावे देणे सोपे असते. मात्र ४ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचा डेटा धोक्यात येतो, तेव्हा 'काँग्रेस जिताओ पार्टी' किंवा 'कॉकरोज जनता पार्टी'च्या राजकीय आरोपांपेक्षा विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे रक्षण करणे अधिक महत्त्वाचे ठरते.

फडणवीस सरकारने आता या प्रकरणात केवळ पोलिसांत पत्र देऊन थांबण्याऐवजी डेटा कुठून लीक झाला, कोण जबाबदार आहे आणि भविष्यात अशी घटना पुन्हा होऊ नये यासाठी कोणती ठोस सुरक्षा व्यवस्था उभारली जाणार, याची स्पष्ट उत्तरे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना आणि पालकांना द्यायला हवीत.

कारण शिक्षण प्रशासनाच्या अपयशावर पडदा टाकण्यासाठी राजकीय घोषणाबाजी उपयोगी पडत नाहीविद्यार्थ्यांच्या डेटाची सुरक्षा आणि प्रशासनाची जबाबदारी याचाच हिशेब जनतेला हवा आहे.

# वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर टांगती तलवार सरकारनंतर आता न्यायालयाचेही कठोर धोरण!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

विशेष प्रतिनिधी । मुंबई

वैद्यकीय शिक्षणातील (MBBS) वाढता ताण आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न गंभीर बनलेला असतानाच, आता शासन आणि न्यायव्यवस्था या दोघांनीही विद्यार्थ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याचे चित्र समोर येत आहे. प्रथम वर्ष एमबीबीएसच्या परीक्षांबाबत मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच दिलेला एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कठोर निर्णय या स्थितीवर शिक्कामोर्तब करणारा ठरला आहे.

**चारच संधी, त्यापेक्षा जास्त नाही!**

मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती फिरदोश पी. पुणीवाला आणि न्यायमूर्ती आर. आय. छागला यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले आहे कि, प्रथम वर्ष एमबीबीएस (FiA°st PA°ofessional MBBS) अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्याला कोणत्याही परिस्थितीत चारपेक्षा जास्त संधी (Attempts) दिल्या जाऊ शकत नाहीत. मग विद्यार्थ्याने प्रत्येक फेरीत कोणत्या विषयाची परीक्षा दिली आहे किंवा तो किती विषयांत बसला आहे, याने काहीही फरक पडत नाही.

हे प्रकरण महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या (MUHS) एका विद्यार्थिनीच्या याचिकेशी संबंधित होते. ऑगस्ट २०२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या या विद्यार्थिनीने अंतर्गत मूल्यमापन पूर्ण केले होते. मात्र, 'ॲनाटोमी' (Anatomy) या विषयाच्या थिअरी परीक्षेत ती सलग तीन वेळा अपयशी ठरली. चौथ्या वेळी परीक्षेला बसण्याची परवानगी मागितली असता, विद्यापीठाने प्रवेशाच्या तारखेपासून चार वर्षांचा कालावधी आणि उपलब्ध संधी संपल्याचे सांगत तिला रोखले. याविरोधात विद्यार्थिनीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती; परंतु न्यायालयाने तिची याचिका फेटाळून लावली.

**विद्यार्थ्यांच्या भावना आणि वास्तव**

गेल्या काही वर्षांत नॅशनल मेडिकल कमिशनच्या (NMC) नियमांमुळे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक दडपण आले आहे. कोरोना काळातील शैक्षणिक वेळापत्रकाचा झालेला खोळंबा, कौटुंबिक किंवा आरोग्यविषयक समस्या आणि एमबीबीएस प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाची प्रचंड काठिण्यपातळी यामुळे अनेक विद्यार्थी नैराश्याच्या गर्तेत सापडले आहेत.

विद्यार्थी संघटना आणि पालकांचे म्हणणे आहे की, वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा राखणे जितके महत्त्वाचे आहे, तितकीच विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. अपयशाच्या काळात त्यांना पुन्हा सावरण्यासाठी किंवा विशेष संधी देण्यासाठी कोणताही पर्याय उपलब्ध न ठेवल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य उद्ध्वस्त होण्याचा धोका निर्माण होतो.

**सरकार आणि न्यायालयाची भूमिका**

एकीकडे वैद्यकीय क्षेत्रातील गुणवत्ता आणि डॉक्टरांची क्षमता यावर कोणताही तडजोड न करण्याचा सरकारचा आणि नॅशनल मेडिकल कमिशनचा पवित्रा आहे. तर दुसरीकडे, उच्च न्यायालयानेही नियमांवर बोट ठेवत स्पष्ट केले आहे की, वैद्यकीय शिक्षणात शिस्त राखण्यासाठी चार प्रयत्नांची मर्यादा अत्यंत आवश्यक आहे.

परंतु, या कठोर नियमांमुळे हजारो वैद्यकीय विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात सापडले आहे. सरकार किंवा न्यायव्यवस्था कोणीही त्यांच्या या बिकट परिस्थितीवर संवेदनशीलतेने विचार करण्यास तयार नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया वैद्यकीय वर्तुळातून उमटत आहे. या निर्णयामुळे आता प्रथम वर्षात अडकलेल्या विद्यार्थ्यांना आपली डॉक्टर बनण्याची स्वप्ने सोडून द्यावी लागतील का, असा सवाल निर्माण झाला आहे.

## संपादकीय

### ७.८ टक्क्यांचा जल्लोष की आकड्यांचा आभास?

भारताचा जीडीपी ७.८ टक्क्यांनी वाढला आणि सरकारच्या आर्थिक दालनात जल्लोष सुरू झाला. जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताची वाढ सर्वाधिक असल्याचे सांगत सरकारने पुन्हा एकदा 'विकासगाथे'चा ढोल वाजवला. पण या ढोलाचा आवाज जितका मोठा आहे, तितकेच त्यामागचे आकडे आता प्रश्नांच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

वादाचा केंद्रबिंदू आहे तो मागील वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या जीडीपी आकड्याचा. हा आकडा पूर्वी सुमारे ८६ लाख कोटी रुपये होता. नव्या जीडीपी मालिकेत तो सुमारे ८०.४४ लाख कोटी रुपयांवर आला. सरकारच्या मते ही सुधारणा नवीन आधारवर्ष, अधिक अद्ययावत माहिती आणि बदललेल्या सांख्यिकीय पद्धतीमुळे झाली. माजी अर्थसचिव सुभाषचंद्र गर्ग मात्र या सुधारणांवर गंभीर आक्षेप घेत आहेत. म्हणजे प्रश्न एवढाच नाही की ७.८ टक्के बरोबर की चूक? खरा प्रश्न आहे सरकारच्या आर्थिक आकडेवारीवर सामान्य नागरिकाने विश्वास तरी कसा ठेवायचा? आकडेवारी बदलणे हे अर्थव्यवस्थेच्या मोजमापातील सामान्य तांत्रिक प्रक्रिया असू शकते. पण जेव्हा जुन्या मालिकेतील आकडे मोठ्या प्रमाणावर बदलतात आणि त्याच वेळी चालू वर्षातील वाढीचा आकडा विक्रमी असल्याचे सांगितले जाते, तेव्हा सरकारने केवळ 'पद्धत बदलली' एवढे सांगून भागणार नाही. कोणता आकडा का बदलला, कोणत्या सूत्राने बदलला आणि त्या बदलाचा वाढीच्या दरावर नेमका किती परिणाम झाला याचा साधा, पारदर्शक आणि स्वतंत्रपणे तपासता येईल असा हिशेब देशासमोर ठेवावा लागेल. याच ठिकाणी 'सांख्यिकीय कसरती'चा संशय जन्म घेतो. सरकारच्या आर्थिक सल्लागार परिषदेकडून संजीव संन्याल यांनी नव्या पद्धतीचे समर्थन केले आहे. त्यांच्या मते आधारवर्ष बदलणे ही आवश्यक आणि आंतरराष्ट्रीय पद्धतीशी सुसंगत प्रक्रिया आहे. सरकारनेही जीडीपी मालिकेबाबत सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे. पण सरकारला एक प्रश्न विचारावाच लागेल आकडे योग्य असतील तर त्यांच्याभोवती एवढा संशय निर्माण का झाला? आर्थिक वाढीचा खरा अर्थ केवळ जीडीपीच्या स्क्रीनवर दिसणारा टक्का नाही. त्या वाढीचे प्रतिबिंब रोजगारात दिसले पाहिजे. कुटुंबांच्या उत्पन्नात दिसले पाहिजे. ग्रामीण बाजारपेठेत दिसले पाहिजे. छोट्या दुकानदाराच्या उलाढालीत दिसले पाहिजे. तरुणांच्या हाताला काम मिळण्यात दिसले पाहिजे. इथेच '७.८ टक्के' या चमकदार आकड्याची खरी परीक्षा सुरू होते. सरकारच्या बाजूनेही काही आकडे आहेत. नव्या आकडेवारीनुसार खासगी गुंतवणुकीत वाढीची चिन्हे दिसत आहेत आणि स्थिर भांडवली निर्मितीचा वाटाही वाढला आहे. त्यामुळे संपूर्ण आर्थिक चित्र काळेकुट्ट आहे, असे म्हणणेही तितकेच चुकीचे ठरेल. म्हणूनच सरकारची खरी कसोटी विरोधकांना गप्प करण्यात नाही; तर आकडे स्वतंत्र अर्थतज्ज्ञांसमोर खुले ठेवण्यात आहे. जीडीपीचा आकडा ७.८ टक्के असेल तर तो आनंदाचा विषय आहे.

पण त्या वाढीचा लाभ किती लोकांपर्यंत पोहोचला, रोजगार किती निर्माण झाले, वास्तविक वेतन किती वाढले आणि ग्रामीण भारताची क्रयशक्ती किती मजबूत झाली, याचे उत्तरही त्याच उत्साहाने द्यावे लागेल. कारण कागदावरची अर्थव्यवस्था आणि माणसाच्या खिशातील अर्थव्यवस्था यात फरक असतो. सरकारने हा फरक मिटवला तर ७.८ टक्के हा केवळ आकडा राहणार नाही; तो जनतेच्या जीवनातील बदल बनेल. पण आकडे वाढत असताना प्रश्नही वाढत राहिले, तर आर्थिक विकासाच्या जाहिरातीपेक्षा आर्थिक पारदर्शकतेचा हिशेब अधिक महत्त्वाचा ठरेल. आज देशाला '७.८ टक्के'वर टाळ्या वाजवायला सांगण्यापेक्षा एकच गोष्ट हवी आहे या ७.८ टक्क्यांचा प्रत्येक पैशाशी, प्रत्येक रोजगाराशी आणि प्रत्येक भारतीयाच्या जीवनमानाशी असलेला संबंध स्पष्ट करणारा हिशेब. नाहीतर विकासाचा फुगा कितीही मोठा फुगवला, तरी सुई जनतेच्या प्रश्नांचीच असेल.

# पिंपळे गुरवमध्ये उपचारादरम्यान ६० वर्षीय रुग्णाचा मृत्यू; दोन डॉक्टरांविरुद्ध गुन्हा

## ससूनच्या तज्ज्ञ समितीच्या अहवालानंतर सांगवी पोलिसांची कारवाई

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपळे गुरव येथील सुश्रुत सर्जिकल हॉस्पिटलमध्ये उपचार आणि शस्त्रक्रियेदरम्यान डॉक्टरांकडून झालेल्या कथित निष्काळजीपणामुळे ६० वर्षीय रुग्णाचा मृत्यू झाल्याप्रकरणी दोन डॉक्टरांविरुद्ध सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ससून रुग्णालयातील तज्ज्ञ वैद्यकीय समितीने उपचारादरम्यान प्रथमदर्शनी निष्काळजीपणा झाल्याचा अभिप्राय दिल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली.

बबन शिवराम कातखडे (वय ६०, रा. मोशी) असे मृत रुग्णाचे नाव आहे. कातखडे यांच्यावर पिंपळे गुरव येथील सुश्रुत सर्जिकल हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली होती. उपचार सुरू असताना त्यांची प्रकृती बिघडून मृत्यू झाला. यानंतर त्यांच्या नातेवाईकांनी डॉक्टरांच्या उपचारपद्धतीवर आणि वैद्यकीय निष्काळजीपणाबाबत गंभीर आरोप केले होते.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन उपचारादरम्यान नेमकी कोणती वैद्यकीय प्रक्रिया करण्यात आली, त्यात काही त्रुटी किंवा निष्काळजीपणा झाला का, तसेच रुग्णाच्या मृत्यूशी त्याचा संबंध आहे का, याची




वैद्यकीय तपासणी करण्यासाठी प्रकरण ससून रुग्णालयाच्या तज्ज्ञ समितीकडे सोपवण्यात आले होते.

तज्ज्ञ समितीने दिलेल्या अंतिम अभिप्रायात उपचारादरम्यान प्रथमदर्शनी निष्काळजीपणा झाल्याचे नमूद करण्यात आल्यानंतर पोलिसांनी पुढील कायदेशीर कारवाई केली. त्यानुसार ३ सप्टेंबर २०२६ रोजी संबंधित दोन डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणाचा पुढील तपास सांगवी पोलिसांकडून सुरू असून, उपचाराची कागदपत्रे, वैद्यकीय अहवाल तसेच संबंधित परिस्थितीची चौकशी केली जात आहे.

दरम्यान, गुन्हा दाखल होणे म्हणजे संबंधित डॉक्टर दोषी सिद्ध झाले आहेत, असा अर्थ होत नाही. वैद्यकीय निष्काळजीपणाबाबतचा अंतिम निष्कर्ष तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार आहे.

## मोशीतील 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प याच महिन्यात सुरू होणार; महापालिका आयुक्तांची घोषणा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपोतील बहुप्रतिक्षित 'वेस्ट टू एनर्जी' (कचऱ्यापासून ऊर्जा) प्रकल्प सर्व दुरुस्तीचे काम पूर्ण करून याच महिन्याच्या अखेरीस पुन्हा कार्यान्वित करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सभेत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.

प्रकल्प पुन्हा सुरू झाल्यानंतर शहरात गोळा होणाऱ्या कचऱ्यापैकी सुमारे एक हजार टन कचऱ्यावर दररोज प्रक्रिया करणे शक्य होईल, ज्यामुळे महापालिकेच्या कचरा व्यवस्थापनावरील ताण मोठ्या प्रमाणावर कमी होईल, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला.

थोडक्यात ठळक मुद्दे:




प्रकल्पाची दुरुस्ती: दुर्घटनेपूर्वीच चिमणी कोसळल्यामुळे बंद पडलेल्या या प्रकल्पाच्या चिमणी दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे. बायोमायनिंग आणि नवीन निविदा: मोशीतील पहिल्या टप्प्यातील बायोमायनिंगचे काम अंतिम टप्प्यात आले असून, उर्वरित कचऱ्याच्या विल्हेवाटसाठी लवकरच नवीन निविदा काढल्या जातील. विद्यमान ठेकेदारांना कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, हे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

इतर महत्त्वाचे निर्णय: शहरात नवीन कचरा प्रक्रिया केंद्रांसाठी जागांचा शोध सुरू असून, शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांचे स्वतंत्रपणे ऑडिट केले जाणार आहे. तसेच काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबत विभागीय चौकशीही सुरू आहे.

## सांगवीत खळबळ! महापालिकेच्या करसंकलन विभागात एसीबीची धाड; लिपिक लाच घेताना रंगेहात जेरबंद

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सांगवीतील क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या करसंकलन विभागात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (अउइ) धडक कारवाई केली आहे. या कारवाई दरम्यान विभागातील एक लिपिक कर्मचारी लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात रंगेहात अडकला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, उमेश कुटे असे या प्रकरणातील संशयित लिपिक कर्मचाऱ्याचे नाव आहे. लाचखोरीच्या या



प्रकारानंतर महापालिका वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

कारवाईचे प्रमुख मुद्दे:

घटना: सांगवी महापालिका क्षेत्रीय कार्यालयातील करसंकलन कक्ष.

कारवाई: अँटी करप्शन ब्युरो (अउइ) पथकाची यशस्वी सापळा रचून धाड.

सध्याची स्थिती: या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, एसीबीकडून लाचेची नेमकी रक्कम आणि कारणाबाबतचा सखोल तपास सुरू आहे.

## चिंचवडगावात ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा कट्टा आणि वाचनालयाचे लोकार्पण; रस्टन व एसकेएफ कॉलनीतील नागरिकांना हक्काचे व्यासपीठ

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील चिंचवडगावातील रस्टन कॉलनी आणि एसकेएफ कॉलनी परिसरात ज्येष्ठ नागरिकांसाठी उभारण्यात आलेल्या विरंगुळा कट्टा व वाचनालयाचे लोकार्पण नुकतेच एका दिमाखदार सोहळ्यात पार पडले. कै. सौ. मंगलताई रमाकांत सौंदणकर यांच्या स्मरणार्थ आणि नगरसेवक अनंत को-हाळे यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवार (दि. २) सायंकाळी हा सोहळा संपन्न झाला.

ज्येष्ठ नागरिकांना एकमेकांशी संवाद साधण्यासाठी आणि विरंगुळ्यासाठी हक्काचे ठिकाण मिळावे, तसेच परिसरात वाचन संस्कृती रुजावी, या दुहेरी उद्देशाने नगरसेवक निधीतून या सुविधांची निर्मिती करण्यात आली आहे.

लोकार्पण सोहळ्यातील प्रमुख मुद्दे:

मान्यवरांचे विचार: ''ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा अमूल्य ठेवा असून त्यांच्यासाठी अशा सुविधा निर्माण करणे ही लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी आहे,'' असे विचार नगरसेवक अनंत को-हाळे यांनी या वेळी व्यक्त केले.

सामाजिक उपक्रम: रमामंगल सोशल फाउंडेशनचे सर्वेसर्वा तथा शिवसेना जिल्हा संघटक संतोष सौंदणकर यांनी, आईच्या स्मरणार्थ समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा भविष्यातही कायम ठेवणार असल्याची ग्दिली दिली.

उपस्थिती: या लोकार्पण सोहळ्यास परिसरातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि रमामंगल फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अजितदादांचे 'चाकण महापालिका' निर्मितीचे स्वप्न अधुरेच? वाढत्या समस्यांमुळे चाकणकरांच्या अपेक्षा पुन्हा उंचावल्या

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

चाकण एमआयडीसीचा झालेला प्रचंड विस्तार, झपाट्याने वाढलेली लोकसंख्या आणि गंभीर होत चाललेली वाहतूक कोंडी या पार्श्वभूमीवर चाकण परिसरासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणेची मागणी पुन्हा एकदा तीव्र झाली आहे. या मागणीला आता केवळ विकासाचा मुद्दा नसून, महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पाहिलेल्या स्वप्नाची भावनिक किनारही लाभली आहे.

प्रस्तावामागील पार्श्वभूमी आणि घोषणा: ८ ऑगस्ट २०२५ रोजी अजित पवार यांनी चाकणला स्वतंत्र महापालिका देण्याबाबत घोषणा केली होती. मात्र, त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर मर्यादा स्पष्ट करत चर्चेला पूर्णविराम दिला होता. आता पुन्हा एकदा चाकण, आळंदी आणि राजगुरूनगर या तीन नगरपरिषदांसह लगतच्या सुमारे ५० गावांचा समावेश करून स्वतंत्र महापालिका किंवा 'इंडस्ट्रियल टाऊनशिप' स्थापन करण्याची चर्चा सुरू झाली असून, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए तसेच जिल्हा प्रशासनाकडूनही या संकल्पनेला अनुकूलता दर्शवली जात आहे.

पायाभूत सुविधांचा अभाव: आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा हब असलेल्या चाकणमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापनाचा गंभीर ताळमेळ बिघडला आहे.

वाहतूक कोंडी आणि उद्योगांवर परिणाम: सततच्या वाहतूक कोंडीमुळे कंपन्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली असून, नफा घटल्यामुळे जवळपास वीस लघुउद्योजक कंपन्या प्रकल्प बंद करण्याच्या विचारात असल्याची चर्चा आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अभावामुळे रखडलेला विकास आणि उद्योगांसमोरील अडचणी दूर करण्यासाठी राज्य सरकार आगामी काळात काय निर्णय घेणार, आणि अजितदादांचे हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याचे शिवधनुष्य कोण पेलणार, याकडे आता संपूर्ण चाकण पंचक्रोशीचे लक्ष लागले आहे.

## बावडण: चारित्र्याच्या संशयावरून झोपेत असलेल्या पत्नीचा धारदार शस्त्राने खून

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

बावडण परिसरातील तोडकर वस्ती (भुगाव रोड) येथे धक्कादायक घटना घडली आहे. कौटुंबिक वादातून आणि चारित्र्याच्या संशयावरून पतीने आपल्या पत्नीचा निर्घृण खून केला.

आरोपी: परशुराम भागप्पा हरिजन (वय ४८ वर्षे, मूळ रा. इंचाळ, जि. विजापूर, कर्नाटक).

घटना: २ सप्टेंबरच्या रात्री फिर्यादी मुलगा सुरेश हरिजन, त्याची आई निलाबाई आणि वडील परशुराम घरात झोपले होते. पहाटेच्या सुमारास संशयित परशुराम याने पत्नी निलाबाई यांच्याशी वाद घालत धारदार शस्त्राने गळ्यावर वार करून त्यांची हत्या केली व घटनास्थळावरून पळ काढला. बावडण पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

**तळेगाव दाभाडे: फोन पे 'केवायसी'च्या नावाखाली ज्येष्ठ नागरिकाला १.५ लाखांचा गंडा**

तळेगाव चाकण रोडवरील सद्गुरू कृपा जनरल स्टोअरमध्ये आलेल्या एका अज्ञात भामट्याने ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा विश्वासघात केला.

घटना: आरोपीने दुकानात येऊन ''फोन पे ची केवायसी करायची




आहे'' असा बनाव रचला. फिर्यादी मनोहर पिंगळे यांचा मोबाईल, आधार कार्ड आणि फोटो काढून परस्पर मोबाईलद्वारे १,५०,००० रुपयांचे वैयक्तिक कर्ज (झशअीपरश्र डेरप) स्वतः च्या खात्यावर वळवून फसवणूक केली. तळेगाव दाभाडे पोलीस अज्ञात इसमाचा शोध घेत आहेत.

**पिंपरी: सायबर फ्रॉडचे पैसे लपवण्यासाठी तरुणींचे बँक पासबुक व एटीएम कार्ड लांबवले**

संत तुकारामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ई-सेवा केंद्राच्या कामाच्या बहाण्याने तरुणींची बँक खाती गैरमार्गासाठी वापरल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

आरोपी: ओम अविनाश गाडे (वय २३) व सौरभ दत्तात्रय पाटणे (वय २३, दोघे रा. भोर, पुणे - दोघांना अटक).

घटना: आरोपींनी १८ वर्षीय विद्यार्थिनी आणि तिच्या मैत्रिणीला ई-सेवा केंद्र व शिष्यवृत्तीचे पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर दोघींचे बँक ऑफ महाराष्ट्रचे पासबुक व एटीएम कार्ड परस्पर घेऊन सायबर फसवणुकीची रक्कम त्या खात्यावर वळवून फसवणूक केली.

**वाकड: मुलाच्या इंजिनिअरिंग ॲडमिशनच्या नावाखाली १० लाखांची फसवणूक**

दिल्ली टेक्निकल युनिव्हर्सिटीमध्ये मुलाला प्रवेश मिळवून देतो असे सांगून रहाटणी येथील पालकाची १० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.

आरोपी: 'एच.एम. रियल्टी'चे सिद्धार्थ, विड्न, वेदिका आणि तन्मय.

घटना: फिर्यादी अमित धरमचंद जैन यांच्याकडून आरोपींनी ३ लाख रुपये ऑनलाइन आणि ७ लाख रुपये रोख, असे एकूण १० लाख रुपये घेतले. पैसे उकळल्यानंतर मुलाला कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळवून दिले नाही आणि घेतलेली रक्कमही परत न करता अपहार केला. काळेवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेनुसार चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# भिमाशंकरवाडीतील ९६ कुटुंबांचे कायमस्वरूपी पुनर्वसन; शासनाकडून मंजुरीची औपचारिकता पूर्ण

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर । प्रतिनिधी

दरडप्रवण क्षेत्र म्हणून घोषित झालेल्या श्री क्षेत्र भिमाशंकर येथील भिमाशंकरवाडीतील ९६ कुटुंबांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाला महाराष्ट्र शासनाने अधिकृत मंजुरी दिली आहे. भूस्खलन, अतिवृष्टी आणि जमीन खचण्याच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर सर्वे क्रमांक १ मध्ये नवीन गावठाण उभारण्यात येणार असून, या निर्णयामुळे ग्रामस्थांच्या सुरक्षेचा प्रश्न मार्गी लागला आहे.

श्री क्षेत्र भिमाशंकर हे राज्याचे प्रमुख धार्मिक आणि पर्यटन केंद्र असल्यामुळे येथे वर्षभर भाविकांची वर्दळ असते. आगामी २०२७ मधील नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात येथील गर्दी मोठ्या प्रमाणावर वाढण्याची दाट शक्यता आहे. मात्र, सध्याच्या गावठाणातील दाट व अनियोजित बांधकामे, अपुरे रस्ते, मोकळ्या जागेचा अभाव आणि आपत्कालीन यंत्रणांच्या मार्गक्रमणातील अडचणींमुळे परिसराचा सुनियोजित विकास करणे अपरिहार्य झाले होते.

### भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणाचा अहवाल निर्णायक

पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या विशेष विनंतीवरून भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण पथकाने २७ जुलै २०२६ रोजी या परिसराची पाहणी केली होती. हा परिसर मध्यम ते तीव्र उतारांच्या 'यू' आकाराच्या खोऱ्यात वसलेला असून, नैसर्गिक जलनिस्सारणातील त्रुटी, अनियंत्रित खोदकाम आणि मानवनिर्मित दबावामुळे भूस्खलनाचा धोका वाढल्याचे निरीक्षण GSI ने नोंदवले होते. नैसर्गिक आपत्तीचा धोका टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून तात्काळ पुनर्वसन करणे आवश्यक असल्याचा स्पष्ट निष्कर्ष अहवालात मांडण्यात आला होता. या अहवालाच्या आधारे जिल्हा प्रशासनाने शासनाकडे प्रस्ताव पाठवला होता.

### पुनर्वसनाची रूपरेषा आणि मिळणाऱ्या सुविधा

स्वतंत्र भूखंड: पात्र ठरणाऱ्या प्रत्येक कुटुंबास किमान ५०० चौरस फुटांचा स्वतंत्र भूखंड दिला जाणार आहे. मूळ भूखंड यापेक्षा मोठा असल्यास आणि नवीन आराखड्या



मध्ये उपलब्धता असल्यास, व्यवहार्यतेनुसार अतिरिक्त क्षेत्र देण्याची तरतूद ठेवण्यात आली आहे.

नियोजित बांधकाम: प्रचलित विकास नियंत्रण आणि बांधकाम नियमांच्या अधीन राहून पुनर्वसित ठिकाणी कायदेशीर व सुरक्षित बांधकामे करून दिली जातील.

गावठाण स्थलांतर: मूळ गावठाणाची जुनी जागा शासनजमा करून संपूर्ण गावठाणाचे सर्वे क्रमांक १ मध्ये यशस्वी स्थलांतर केले जाईल.

### १७२ कोटींच्या प्रकल्पांतर्गत निधीची तरतूद

नियोजन विभागाने ११ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहीर केलेल्या 'श्री क्षेत्र भिमाशंकर आदर्श ग्राम प्रकल्प-टप्पा ३' अंतर्गत तब्बल १७२ कोटी २१ लाख ७५ हजार ३८४ रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे.

या भव्य निधीतून प्रामुख्याने पुढील तरतुदी करण्यात आल्या आहेत:

भूमिसंपादन: १५ कोटी रुपये

पुनर्वसन बांधकाम: ४६ कोटी ८० लाख ३१ हजार २७८ रुपये (निवासी गाळेधारकांसाठी)

याच विकास प्रकल्पात आवश्यक नागरी सुविधांचा समावेश असल्यामुळे पुनर्वसनासाठी वेगळा निधी लागणार नाही.

दरम्यान, वन विभाग, वन्यजीव संरक्षण, पर्यावरण, नगररचना आणि इतर सर्व तांत्रिक परवानग्या मिळवण्याच्या अटीवर ही मंजुरी देण्यात आली असून, हा निर्णय इतर प्रकरणांसाठी पूर्वोदाहरण म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही, असेही शासनाने स्पष्ट केले आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे भिमाशंकरवाडीतील नागरिकांचा सुरक्षित पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला असून आता प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सारांश वृत्त

### संचमान्यतेच्या निकषांमागे खासगीकरणाचा अजेंडा? फडणवीस सरकारच्या शिक्षण धोरणावर शिक्षकांचा संशय!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे । प्रतिनिधी

कनिष्ठ महाविद्यालयांच्या ऑनलाइन संचमान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या सुधारित निकषांविरोधात राज्यभरातील हजारो शिक्षकांनी शुक्रवारी शिक्षण आयुक्त कार्यालयाबाहेर आंदोलन केले. प्रचलित निकष कायम ठेवण्याची मागणी करणाऱ्या शिक्षक महासंघाने या बदलांमुळे शिक्षकांच्या पदांवर, विद्यार्थ्यांच्या तुकड्यांवर आणि एकूणच सरकारी शिक्षण व्यवस्थेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे या बदलांमागे केवळ प्रशासकीय सुधारणा आहेत की सरकारी शिक्षण व्यवस्थेला हळूहळू कमकुवत करण्याची दिशा, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. महासंघाच्या म्हणण्यानुसार, सुधारित संचमान्यतेमुळे विद्यार्थीसंख्या, तुकड्यांची संख्या आणि शिक्षकांच्या पदांवर परिणाम होऊ शकतो. विज्ञान विषयाच्या प्रॅक्टिकलसाठी २० विद्यार्थ्यांची मर्यादा कायम ठेवावी, कनिष्ठ महाविद्यालयातील तासिका पूर्वीप्रमाणे ४५ मिनिटांची ठेवावी, तसेच शिक्षकांचा शासनमान्य कार्यभार कायम ठेवावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

याच ठिकाणी सरकारच्या धोरणावर मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. सरकारी संस्थांमधील शिक्षकांची पदे कमी झाली, तुकड्या कमी झाल्या आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध शैक्षणिक सुविधा आकसल्या, तर त्याचा फायदा अखेरीस कोणाला होणार? सरकारी शिक्षण व्यवस्था कमकुवत झाल्यानंतर खासगी शिक्षण संस्थांसाठी बाजारपेठ अधिक मोठी होणार नाही का?

# दलित साहित्याची निर्मिती सामाजिक समतेसाठी अत्यावश्यक: 'उर्ग्येन आर्ट फेस्टिवल'मध्ये ज्येष्ठ विचारवंतांचा सूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

समाजात आजही अस्तित्वात असलेले जातीभेद आणि असमानता दूर करण्यासाठी दलित साहित्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मानवी मूल्यांची जपणूक करत समतावादी समाज निर्माण करण्यासाठी दलित साहित्याचा प्रभावी प्रसार होणे गरजेचे असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिकांनी व्यक्त केले.

करुणादीप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित 'उर्ग्येन आर्ट फेस्टिवल'च्या समारोपप्रसंगी आयोजित 'कलाकार परिसंवादा'त वक्ते व्यक्त झाले. पद्मश्री ग्यंवाग संपतेन, प्रा. डॉ. विमलताई एस. थोरात, शाहीर संभाजी भगत आणि कवी नितीन चंदनशिवे यांनी या सत्रात सहभाग घेऊन दलित साहित्य आणि कलेच्या सामाजिक दायित्वावर सविस्तर चर्चा केली.

या वेळी विचार मांडताना डॉ. विमलताई थोरात म्हणाल्या, महाराष्ट्रातून उगम पावलेले दलित साहित्य आज देशातील विविध भाषांमध्ये विस्तारले




आहे. देशातील प्रमुख भाषांमध्ये दलित जीवनवास्तवावर लेखन होत असून, या साहित्याचा योग्य भावार्थ विविध भाषांमध्ये पोहोचल्यास वंचित घटकांचे प्रश्न आणि वेदना अधिक व्यापक पातळीवर समजून घेणे शक्य होईल.

सांस्कृतिक राजकारणाच्या अंगाने मांडणी करताना शाहीर संभाजी भगत म्हणाले, सत्तेच्या राजकारणापेक्षा सांस्कृतिक राजकारणाचा प्रभाव दीर्घकाळ टिकणारा असतो. शोषक व असमानतावादी विचारांना छेद देत समता आणि मानवतावादी मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था उभी करण्यासाठी समांतर सांस्कृतिक प्रवाहाची आणि कला-साहित्याची गरज आहे.

तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा उल्लेख करत पद्मश्री ग्यंवाग संपतेन म्हणाले, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित अखंड भारताची निर्मिती करण्यासाठी दलित साहित्य महत्त्वपूर्ण वैचारिक पाया ठरत आहे.

कलावंताच्या भूमिकेवर बोलताना कवी नितीन चंदनशिवे म्हणाले, उपेक्षितांच्या वेदना आणि संघर्ष कलेच्या माध्यमातून लोकांसमोर मांडणे हे प्रत्येक लेखकाचे आणि कलाकाराचे मूळ कर्तव्य आहे. लेखणीतील निर्भीडता आणि संवेदनशीलता टिकवून ठेवून समाजातील विसंगतींवर भाष्य करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष संखद यांनी केले, प्रास्ताविक दिव्या शिंदे आणि डॉ. अस्मिता गायकवाड यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी केले.

# अवसरी बुद्रुकमध्ये बैलगाडा शर्यतीचा थरार; चार दिवसांत ७२० बैलगाड्यांचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी : प्रतिनिधी

अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव) येथे श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडा शर्यतीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शनिवार (दि. २९) ते मंगळवार (दि. १) असे सलग चार दिवस झालेल्या या शर्यतीमध्ये तब्बल ७२० बैलगाड्यांनी सहभाग घेतला.

समस्त ग्रामस्थ अवसरी बुद्रुक, टाव्हरेवाडी, गावडेवाडी तसेच अवसरी बुद्रुक बैलगाडा संघटनेच्या वतीने या शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या बैलगाडा मालकांना एकूण दोन लाख ६२ हजार रुपयांची रोख बक्षिसे, पाच मोटारसायकली, एक इलेक्ट्रिक स्कुटी, कडबा कुट्टी, फ्रीज, एलईडी दूरचित्रवाणी संच तसेच जुंपता बैलगाडा अशी आकर्षक बक्षिसे देण्यात



आली.

पहिल्या दिवशी फळीफोड गाडा विराटभैया वाबळे/प्रवीण थोरात यांचा, तर क्रमांक एक फायनलमध्ये सचिन सुदाम मुहे/निखील गोपाळा थोरवे यांच्या बैलगाडीने बाजी मारली. दुसऱ्या दिवशी फळीफोड गाडा स्वप्नील शांताराम शिंगाडे यांचा, तर क्रमांक एक फायनल ब्रिजेश रखमाजी धुमाळ/विकास नायकोडी यांच्या गाडीने पटकावला.

तिसऱ्या दिवशी फळीफोड गाडा पांडुरंग काळे/ढेरंगे यांचा, तर क्रमांक एक फायनलमध्ये पांडुरंग किसन काळे/ढेरंगे यांच्या गाडीने प्रथम क्रमांक मिळवला. चौथ्या दिवशी फळीफोड गाडा तसेच क्रमांक एक फायनल तुषार भगवान टेमकर/जाधव यांच्या गाडीने पटकावला.

अंतिम स्पर्धेत ४३ गाड्यांमधून प्रथम क्रमांकासाठी एक लाख रुपये, २४४ गाड्यांमधून द्वितीय क्रमांकासाठी ९१ हजार रुपये, तर १३८ गाड्यांमधून तृतीय क्रमांकासाठी ७१ हजार रुपये अशी रोख बक्षिसे देण्यात आली. याशिवाय आकर्षक फायनलसाठी विविध वस्तुरूप बक्षिसांचीही घोषणा करण्यात आली होती.

या यात्रेचे व बैलगाडा शर्यतीचे नियोजन अजित चव्हाण, संजय हिंगे, किशोर हिंगे, विनोद हिंगे, माउली हिंगे, चिनू हिंगे, पंकज हिंगे, सुधीर हिंगे, संजय चव्हाण, सूरज हिंगे, नितीन हिंगे, बाजी टेमकर, अक्षय टाव्हरे, दीपक हिले आणि संतोष शेटे यांनी केले. ग्रामस्थ, बैलगाडा मालक व शौकिनांच्या मोठ्या उपस्थितीत चार दिवसांचा हा सोहळा उत्साहात पार पडला.

# कर्मचाऱ्यांनो सावधान! ऑफिसच्या वेळेत सोशल मीडिया वापरणे पडणार महागात?

## नवे नियम लागू होण्याची शक्यता; सविस्तर माहिती समोर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

कार्यालयीन वेळेत वैयक्तिक कामांसाठी सोशल मीडियाचा वापर करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी एक मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर येत आहे. ऑफिसच्या वेळेत सातत्याने सोशल मीडिया हाताळणे आता कर्मचाऱ्यांना चांगलेच महाग पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उत्पादकता वाढवण्यासाठी आणि कामाच्या ठिकाणी शिस्त राखण्यासाठी कंपन्यांकडून आता नवीन आणि कडक नियमावली लागू केली जाण्याचे संकेत मिळत आहेत.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक कंपन्या आपल्या अंतर्गत धोरणांमध्ये मोठे बदल करण्याच्या तयारीत आहेत. यामध्ये कार्यालयीन वेळेत सोशल मीडिया ॲप्सचा वापर मर्यादित करणे किंवा त्यावर पूर्णपणे बंदी घालणे अशा उपाययोजनांचा समावेश असू शकतो. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर दंडात्मक किंवा शिस्तभंगविषयक कारवाई देखील केली जाऊ शकते, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.नवीन नियमांमागील मुख्य कारणे:उत्पादकतेवर होणारा परिणाम: सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामाच्या गतीवर आणि गुणवत्तेवर नकारात्मक परिणाम होत असल्याचे अनेक सर्वेक्षणांतून समोर आले आहे.माहितीची सुरक्षा कार्यालयीन नेटवर्कवर वैयक्तिक सोशल मीडिया अकाउंट्स वापरल्याने सायबर सुरक्षेचा धोका निर्माण होऊ शकतो. कामाच्या ठिकाणची शिस्त: कर्मचाऱ्यांनी आपले पूर्ण लक्ष ठरवून दिलेल्या जबाबदाऱ्यांवर केंद्रित करावे, हा यामागील मुख्य उद्देश आहे.या संभाव्य बदलांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये आतापासूनच चिंतेचे वातावरण पाहायला मिळत आहे. मात्र, ही नियमावली नेमकी कधीपासून आणि कोणत्या स्वरूपात लागू होणार, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. कर्मचाऱ्यांनी आपल्या कंपनीच्या अधिकृत 'एचआर' मार्गदर्शक तत्त्वांची तपासणी करून त्यानुसार खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे.

# झाडांच्या फांद्या छाटणीसाठी पीसीएमसीचे स्वतंत्र धोरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

शहरातील सोसायट्या तसेच सार्वजनिक रस्त्यांवरील झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून स्वतंत्र आणि पारदर्शक 'ट्री प्रुनिंग पॉलिसी' तयार करण्यात येणार आहे. याबाबतचा सविस्तर मसुदा तातडीने तयार करण्याचे निर्देश स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत.

शहरातील सोसायट्यांच्या आवारातील किंवा रस्त्यालगतच्या झाडांच्या धोकादायक फांद्या छाटण्यासाठी नागरिकांना अनेकदा खासगी कंत्राटदारांची मदत घ्यावी लागते. त्यासाठी सोसायट्यांना मोठा आर्थिक खर्चही करावा लागतो. नव्या धोरणामुळे अशा छाटणीचा खर्च महापालिकेकडून उचलण्याची तरतूद करण्यात येणार असून, नागरिकांवर किंवा सोसायट्यांवर आर्थिक भार पडणार नाही, अशी भूमिका घेण्यात आली आहे.

छाटणीच्या नावाखाली झाडांच्या अवाजवी फांद्या तोडणे किंवा अनधिकृतपणे वृक्षतोड करण्याच्या प्रकारांना आळा घालण्याचेही प्रस्तावित धोरणाचे उद्दिष्ट आहे. यासाठी छाटणीची पद्धत, आवश्यकतेचे निकष आणि परवानगीची प्रक्रिया निश्चित केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारांसह संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित करण्याची व्यवस्था केली जाणार आहे. सध्या झाडांच्या फांद्या छाटण्यासाठी नागरिकांना विविध स्तरांवर परवानगीसाठी पाठपुरावा करावा लागतो. त्यामुळे वेळ आणि मनस्ताप सहन करावा लागतो. नव्या धोरणामध्ये ही प्रक्रिया सुलभ, जलद आणि पारदर्शक करण्यावर भर दिला जाणार आहे. नागरिकांच्या तक्रारींची नोंद, पाहणी आणि छाटणीची कार्यवाही यासाठी एकसंध प्रक्रिया निश्चित करण्याचे नियोजन आहे.

पावसाळ्यात तसेच जोरदार वाऱ्यामुळे झाडांच्या धोकादायक फांद्या तुटून रस्त्यावर किंवा वाहनांवर पडण्याच्या घटना घडतात. त्यामुळे नागरिकांची आणि वाहतुकीची सुरक्षितता लक्षात घेऊन आवश्यक त्या ठिकाणी नियमानुसार छाटणी करणे गरजेचे आहे. मात्र, सुरक्षिततेच्या नावाखाली अनावश्यक वृक्षतोड होऊ नये, यासाठी पर्यावरणीय निकषही धोरणात समाविष्ट केले जाणार आहेत.

# डिंभे-माणिकडोह बोगदा रद्द होईपर्यंत लढा सुरूच ठेवणार; देवदत्त निकम यांचा जलसंपदामंत्र्यांच्या घरासमोर आंदोलनाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी : प्रतिनिधी

कुकडी प्रकल्पातील हुतात्मा बाबू गेनू सागर (डिंभे) ते माणिकडोह दरम्यानचा प्रस्तावित बोगदा कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही, असा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनी दिला आहे. हा बोगदा रद्द करण्यासाठी आणि आंबेगाव, जुन्नर व शिरूर परिसरातील शेतकऱ्यांचे हक्काचे पाणी वाचवण्यासाठी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या लोणी-प्रवरा येथील निवासस्थानासमोर डफडे वाजवून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी गुरुवारी (ता. ३) मंचर येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

प्रस्तावित बोगद्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांचे पाणी पळवून नेण्याचा घाट घातला जात असल्याचा आरोप करत निकम म्हणाले की, "या बोगद्याचे सर्वे क्षणही होऊ दिले जाणार नाही. हा प्रकल्प पूर्णपणे रद्द होईपर्यंत आणि शरीरात जीव असेपर्यंत आमचा हा लढा अविरत सुरूच राहील."

यावेळी बोलताना त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींवरही गंभीर सवाल उपस्थित केले. आंबेगावचे लोकप्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची साथ सोडताना डिंभे-माणिकडोह बोगद्याचा मुद्दा उपस्थित केला होता, तसेच सत्तेत गेल्यानंतरही हा बोगदा होऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली होती. मग आता सत्तेत सामील असताना या बोगद्याला मंजुरी कशी मिळाली, असा सवाल निकम यांनी विचारला.

उपस्थित प्रमुख प्रश्न व आक्रमक भूमिका

पाणी योजनांवर अन्याय: आदिवासी पट्ट्यातील तीन महत्त्वाच्या पाणी योजना कुकडी प्रकल्पात का समाविष्ट करण्यात आल्या नाहीत?

म्हाळसाकांत पाणी योजना दुर्लक्षित: डिंभे धरणात अतिरिक्त पाणी उपलब्ध असताना म्हाळसाकांत पाणी योजना का घेतली गेली नाही?

दुजाभावाचा आरोप: जुन्नर तालुक्यातील वडज धरणातून उपसा सिंचन योजनांना सढळ हाताने मंजुरी आणि निधी मिळत असताना, आंबेगाव तालुक्यातील हक्काच्या पाणी योजनांकडे सातत्याने दुर्लक्ष का केले जात आहे?

मंचर येथे पार पडलेल्या या पत्रकार परिषदेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आंबेगाव तालुका युवक अध्यक्ष विशाल वाबळे, संजय बढेकर, कुणाल बाणखेले, शंकर टेमगिरे, तेजस जाधव, गणेश खानदेशे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे आता पाणीवाटपावरून राजकीय संघर्ष तीव्र होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

## सारांश वृत्त

### नेपाळ पुरात मदत की सरकारी यंत्रणेची अग्निपरीक्षा? रस्ते तुटले, गावं अलगद पडली; भारतीय स्वयंसेवक १० तासांचा जीवघेणा प्रवास करत पोहोचतायत!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
काठमांडू : वृत्तसंस्था

नेपाळमध्ये २६ ऑगस्टला आलेल्या भीषण पुरानंतर आठवडा उलटला असला, तरी संकट संपलेले नाही. उलट आता या आपत्तीचा सर्वात कठीण टप्पा समोर येत आहेमुख्य रस्त्यांपासून दूर असलेल्या गावांपर्यंत मदत पोहोचवण्याचा. रासुवा, त्रिशुली आणि आसपासच्या डोंगराळ भागातील अनेक कुटुंबांची घरं, पशुधन, संसारोपयोगी वस्तू आणि रोजगाराचे साधन पुराच्या तडाख्यात वाहून गेले आहे. काही कुटुंबांना अजूनही मूलभूत सुविधा मिळालेल्या नाहीत.

या परिस्थितीत भारतीय स्वयंसेवक अन्नधान्य, कपडे, गाद्या, सौर दिवे आणि इतर आवश्यक साहित्य घेऊन दुर्गम भागात पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. काठमांडूहून काही भागात पोहोचण्यासाठी तब्बल ९ ते १० तासांचा डोंगराळ प्रवास करावा लागत आहे. पुरामुळे रस्ते आणि पूल उद्ध्वस्त झाल्याने ट्रक आणि चारचाकी वाहनांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रासुवा जिल्ह्यात तर काही भागांचा रस्त्यांशी संपर्कच तुटला असून, अनेक ठिकाणी हेलिकॉप्टर हाच एकमेव पर्याय उरला आहे. मात्र एका हेलिकॉप्टर फेरीचा खर्च सुमारे २,००० डॉलर असल्याने मदतकार्याचा खर्चही मोठा आहे.

इथेच सरकारी आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित होतात. हजारो सुरक्षा कर्मचारी आणि हेलिकॉप्टर तैनात करण्यात आले असले तरी दुर्गम गावांपर्यंत मदत पोहोचवणे अजूनही मोठे आव्हान आहे. स्थानिक पातळीवरील पूर्वसूचना व्यवस्था, आपत्कालीन तयारी आणि विशेष बचाव कौशल्यातील उणिवाही या आपत्तीने उघड केल्या आहेत.

पुराचा पाणी ओसरलं, पण संकट ओसरलेलं नाही. आता प्रश्न फक्त जीव वाचवण्याचा नाहीघरं, रोजगार आणि संपूर्ण गावं पुन्हा उभी करण्याचा आहे.

# 'तर ते मला फाशी देतील!' पुतिन यांना रशियात बंडाची भीती, युद्ध थांबविण्यावरून बरेच काही सुरूय..

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली/ वृत्तसंस्था

डोनबासवर पूर्ण ताबा मिळवल्याशिवाय युक्रेन युद्ध थांबवले, तर रशियातील शक्तिशाली वर्तुळात बंड होऊन सत्ता धोक्यात येईल, अशी भीती राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना सतावत असल्याचा खुलासा 'द इकॉनॉमिस्ट'ने केला आहे.

रशिया-युक्रेन युद्धाला अनेक वर्षे उलटूनही रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन युद्धबंदीसाठी कोणत्याही मोठ्या तडजोडीस तयार का नाहीत, यामागचे सर्वात मोठे कारण आता आंतरराष्ट्रीय पातळीवर समोर आले आहे. युक्रेनचा संपूर्ण डोनबास प्रदेश ताब्यात घेतल्याशिवाय जर युद्ध थांबवले, तर रशियातील अत्यंत श्रीमंत, लष्करी आणि राजकीयदृष्ट्या शक्तिशाली लोकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होईल आणि आपली सत्ता धोक्यात येईल, अशी भीती पुतिन यांना सतावत आहे.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मासिक 'द इकॉनॉमिस्ट' च्या एका विशेष अहवालानुसार, आपल्या प्रमुख मागण्या मान्य झाल्याशिवाय युद्ध थांबवणे हे रशियात त्यांचे वैयक्तिक अपयश आणि 'कमकुवतपणा' मानले जाईल. क्रेमलिनच्या एका अंतर्गत सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, युद्ध संपवण्याच्या परिणामांवर चर्चा करताना पुतिन यांनी एकदा थेट म्हटले होते, ''जर मी असे केले, तर ते मला फासावर लटकवतील!''

पुतिन यांच्या मते, रशियामध्ये नेत्याचा कमकुवतपणा कधीही सहन केला जात नाही. रशियन राजकारणाचा इतिहास असा आहे की लोक हिंसा सहन करू शकतात, परंतु नेतृत्वाचे अपयश किंवा माघार कधीही स्वीकारत नाहीत.

युक्रेनच्या डोनेस्तक आणि लुहान्स्क या दोन प्रांतांना मिळून 'डोनबास' म्हटले जाते. यातील सुमारे ९० टक्के भूभागावर सध्या रशियन लष्कराचे नियंत्रण आहे. मात्र, उर्वरित भागावर कब्जा न करता युद्ध थांबवणे पुतिन यांना आपल्या राजकीय अस्तित्वासाठी अत्यंत घातक वाटत आहे.

युद्ध सुरू ठेवणे आणि ते थांबवणे या दोन्ही पर्यायांमध्ये पुतिन अडकले आहेत. युक्रेन सातत्याने रशियाच्या तेल, ऊर्जा आणि महत्त्वाच्या लष्करी तळांवर ड्रोन व क्षेपणास्त्र हल्ले करत आहे, ज्यामुळे रशियाचा युद्धखर्च आणि आर्थिक ताण प्रचंड वाढला आहे.

अहवालानुसार, पुतिन यांना सामान्य जनतेच्या प्रतिक्रियेपेक्षा रशियातील त्या शक्तिशाली वर्तुळाची (ओलिगार्क्स, लष्करी अधिकारी आणि गुप्तचर यंत्रणा) जास्त काळजी आहे, ज्यांच्या हातात प्रचंड पैसा, शस्त्रे आणि थेट सत्ताकेंद्र आहेत. 'द इकॉनॉमिस्ट'च्या मते, रशियातील उच्चभ्रू वर्तुळात आता 'रशियाचा पूर्ण विजय होईल' ही चर्चा थांबली असून हे युद्ध सन्मानपूर्वक कसे संपवायचे, यावर चर्चा सुरू आहे. रशियन व्यवस्थेतील त्रुटी आणि युद्धाची दीर्घकालीन किंमत आता लपलेली नसून, ''राजाकडे वस्त्रे नाहीत'' अशी अंतर्गत भावना वाढीस लागली आहे.

शांतता चर्चेसाठी पुतिन यांनी आधीच स्पष्ट केले आहे की, युक्रेनने रशियाच्या ताब्यातील सर्व भागांवरचा आपला हक्क सोडून द्यावा आणि त्यांना रशियाचा अधिकृत भाग म्हणून मान्यता द्यावी. दुसरीकडे, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी आपली एक इंचही जमीन सोडण्यास ठाम नकार दिला आहे. त्यामुळे डोनबासचा तिढा शांतता प्रक्रियेतील सर्वात मोठा अडथळा ठरला आहे.

फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर केलेल्या पूर्ण क्षमतेच्या आक्रमणानंतर आतापर्यंत युक्रेनचा सुमारे २० टक्के भूभाग रशियाच्या नियंत्रणाखाली आला आहे. या भीषण युद्धात हजारो सैनिक आणि निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून कोट्यवधी युक्रेनियन नागरिकांना स्थलांतर करावे लागले आहे.

## 'बडतर्फी' आधीच ठरली होती का? आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या कारणपत्रिकेवर सर्वोच्च न्यायालयाचा गंभीर सवाल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली (विशेष वृत्त)

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या एका कारणपत्रिकेत 'बडतर्फीसाठी' असा उल्लेख करण्यात आल्याने सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयीन प्रक्रियेच्या निष्पक्षतेवरच गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. तब्बल १६ वर्षे जुन्या खुनाच्या प्रयत्नाच्या प्रकरणात अंतिम आदेश सुनावण्यापूर्वीच प्रकरणाची नोंद 'बडतर्फीसाठी' अशी करण्यात आली होती. त्यामुळे निकाल आधीच ठरवण्यात आला होता का, असा संशय निर्माण होतो, असे सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

न्यायालयीन कारणपत्रिका ही केवळ प्रशासकीय नोंद नसते, तर कोणते प्रकरण कोणत्या कारणासाठी सुनावणीसाठी घेतले जात आहे, याची अधिकृत माहिती त्यातून मिळते. त्यामुळे एखाद्या प्रकरणाचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच त्याला 'बडतर्फीसाठी' असे शीर्षक देणे म्हणजे न्यायालयाचा निर्णय आधीच निश्चित असल्याचा संदेश जाऊ शकतो. हा प्रकार न्यायालयीन प्रक्रियेवरील विश्वासाला धक्का देणारा ठरू शकतो, अशी सर्वोच्च न्यायालयाची भूमिका आहे.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या अधिकृत कारणपत्रिकांमध्ये 'बडतर्फीसाठी' अशी स्वतंत्र नोंद वापरली जात असल्याचे दिसते. मात्र सर्वोच्च न्यायालयासमोरचा मुख्य प्रश्न या शब्दप्रयोगाच्या अस्तित्वाचा नसून, विशिष्ट प्रकरणात अंतिम आदेश होण्यापूर्वीच असा उल्लेख का करण्यात आला, हा आहे.

न्यायव्यवस्थेचा पाया म्हणजे निष्पक्ष सुनावणी आणि निर्णयापूर्वी कोणताही पूर्वग्रह नसणे. त्यामुळे ही केवळ कारणपत्रिकेतील तांत्रिक चूक मानायची की न्यायालयीन पारदर्शकतेचा गंभीर प्रश्न म्हणून पाहायचे, याकडे आता लक्ष लागले आहे. निकाल न्यायालयात ठरतो की कारणपत्रिकेतच त्याची दिशा आधी ठरते? हा सर्वोच्च न्यायालयाच्या सवालामुळे निर्माण झालेला सर्वात मोठा प्रश्न आहे.

## वेगाची हौस, हिरोगिरीची मानसिकता; लायसन्सची वयोमर्यादा २१ वर्षे करावी, राष्ट्रीय मराठी संघाची नितीन गडकरींकडे मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

देशातील वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर तरुण वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी चारचाकी वाहनांचे ड्रायव्हिंग लायसन्स देण्याची किमान वयोमर्यादा १८ वरून २१ वर्षे करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रीय मराठी संघाने केली आहे. संघाच्या शिष्टमंडळाने केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन त्यांना नुकतेच निवेदन सादर केले.

१८ वर्षांच्या वयात वाहन चालविण्याचा परवाना मिळाल्यानंतर काही तरुण अनुभवाचा अभाव, वेगाची हौस आणि 'हिरोगिरी'च्या मानसिकतेमुळे धोकादायक पद्धतीने वाहन चालवतात. वेगाने वाहन चालविणे, स्टंटबाजी, ओव्हरटेकिंग, वाहन चालविताना मोबाइलचा वापर तसेच वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष यामुळे अपघातांचा धोका वाढतो. या अपघातांमध्ये केवळ चालकच नव्हे, तर निष्पाप पादचारी, दुचाकीस्वार आणि इतर वाहनचालकांचेही जीव धोक्यात येतात, असे निवेदनात नमूद आहे.

नवीन ड्रायव्हिंग लायसन्स देण्यापूर्वी युवा अर्जदारांसाठी अनिवार्य 'रोड सेफ्टी व जबाबदार ड्रायव्हिंग' कार्यशाळा आयोजित करावी. १८ ते २१ वर्षे वयोगटातील युवकांसाठी विशेष रस्ता सुरक्षा व व्यावहारिक प्रशिक्षण, हायवे ड्रायव्हिंग, स्पीड लिमिट, लेन अनुशासन, ओव्हरटेकिंग, नशेत वाहन न चालविणे आणि स्टंटबाजीच्या धोक्यांबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षणाच्या शेवटी रस्ता सुरक्षेशी संबंधित अनिवार्य परीक्षा किंवा मूल्यांकन ठेवावे, असेही संघाने सुचविले आहे.

संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंद रेखी, कोषाध्यक्ष सुभाष लोखंडे, दिल्ली प्रदेश अध्यक्ष अतुल बोकरिया जैन, सल्लागार श्रीराम जोशी उपस्थित होते.

# गोपनीयतेचा प्रश्न : जात सांगितली, पण ती सुरक्षित राहणार का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

जात गणनेतील सर्वात दुर्लक्षित मुद्दा म्हणजे गोपनीयता. नागरिकाकडून जात, कुटुंब, सामाजिक आणि इतर वैयक्तिक माहिती घेतली जाणार असेल, तर ती माहिती केवळ सांख्यिकीय विश्लेषणापुरतीच वापरली जाईल, याची ठोस हमी आवश्यक आहे. जनगणना ही मूलतः व्यक्तीची माहिती गोळा करणारी प्रक्रिया असली तरी तिच्या नोंदींच्या गोपनीयतेला कायदेशीर संरक्षण आहे. पण २०२७ मध्ये हा प्रश्न अधिक गंभीर आहे. कारण आजची जनगणना केवळ कागदी फॉर्मवर थांबणार नाही; मोठ्या प्रमाणावर माहिती डिजिटल पद्धतीने संकलित, साठवली आणि प्रक्रिया केली जाणार आहे. अशा वेळी जातनिहाय वैयक्तिक माहितीचा डेटा लीक झाला तर?

एखाद्या व्यक्तीची जात, उपजात किंवा सामाजिक ओळख सार्वजनिक डेटाबेसमधून बाहेर आली, तर त्याचे परिणाम केवळ वैयक्तिक प्रतिष्ठेपुरते मर्यादित राहणार नाहीत. रोजगार, शिक्षण, कर्ज, विमा, राजकीय लक्ष्यीकरण किंवा सामाजिक भेदभाव यांसारख्या क्षेत्रांत अशा माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः 'ओपन-एंडेड' रकान्यात नागरिकाने स्वतःची जात लिहिली तर ही माहिती अधिक सूक्ष्म पातळीवर जमा होईल. नाव, पत्ता, कुटुंबाची माहिती आणि जात यांचा परस्पर संबंध जोडला गेला, तर जातनिहाय लोकसंख्येचा आकडा आणि व्यक्तिनिहाय सामाजिक ओळख यातील सीमारेषा अत्यंत महत्त्वाची ठरेल. म्हणून सरकारने जनगणनेपूर्वी काही प्रश्नांची स्पष्ट उत्तरे द्यायला हवीत वैयक्तिक जातनिहाय माहिती कोणत्या अधिकाऱ्यांना दिसणार? ती माहिती किती काळ साठवली जाणार? तिचे डिजिटल एन्क्रिप्शन आणि प्रवेश नियंत्रण कसे असेल? एआय किंवा इतर अल्गोरिदमला वैयक्तिक पातळीवरील माहिती दिली जाणार आहे का? डेटा लीक झाल्यास जबाबदारी कोणाची आणि नुकसानभरपाईची व्यवस्था काय? आणखी महत्त्वाचा प्रश्न म्हणजेजनगणनेच्या कच्च्या डेटाचा आणि प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम सांख्यिकीय डेटाचा स्पष्ट फरक सरकार जनतेसमोर ठेवणार का? जनतेला जातनिहाय आकडे हवेत; पण प्रत्येक नागरिकाची जात कोणाला माहीत व्हावी, अशी त्याची सक्तीची इच्छा असेलच असे नाही. त्यामुळे सामाजिक न्यायासाठी आवश्यक असलेली आकडेवारी आणि व्यक्तीची गोपनीयता यांच्यात संतुलन राखणे ही सरकारची घटनात्मक आणि प्रशासकीय जबाबदारी आहे. जात गणनेचा उद्देश समाजाचे वर्गीकरण करून नागरिकांच्या कपाळावर नवी ओळख चिकटवणे नसून, सामाजिक आणि आर्थिक विषमता मोजण्यासाठी विश्वासार्ह आधार निर्माण करणे हा असला पाहिजे. कारण नागरिकाने सरकारवर विश्वास ठेवून आपली जात सांगितली आणि उद्या तीच माहिती त्याच्याविरुद्ध वापरली गेली, तर जात गणना सामाजिक न्यायाचे साधन न राहता डिजिटल सामाजिक नोंदणीचे भयावह रूप धारण करू शकते. म्हणून २०२७ च्या जात गणनेत एक तत्त्व अगदी स्पष्ट असले पाहिजे 'जात मोजा, पण नागरिकाची ओळख उघडी करू नका.' अचूक डेटा हवा, पण त्यासाठी नागरिकांच्या गोपनीयतेची किंमत मोजता कामा नये.

# ना राजदूत, ना यझडी; 'ही' आहे भारतातील पहिली बाइक; ७४ वर्षांपूर्वी झालेली कंपनीची स्थापना

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

हिरो, होंडा, TVS आणि बजाजसारख्या कंपन्यांनी आज भारतीय ऑटोमोबाइल बाजारात आपले भक्कम स्थान निर्माण केले आहे. विविध सेगमेंटमध्ये ग्राहकांना अनेक प्रकारच्या बाइक उपलब्ध आहेत. मात्र, भारतामध्ये अधिकृतपणे बाइकचे उत्पादन सुरू करणारा पहिला ब्रँड कोणता होता? याचे उत्तर म्हणजे रॉयल एनफिल्ड.

मूळतः ब्रिटिश ब्रँड असलेल्या रॉयल एनफिल्डने भारतात पहिल्यांदा अधिकृतपणे बाइकचे उत्पादन सुरू केले. विशेष म्हणजे, १९९४ मध्ये भारतीय ऑटोमोबाइल कंपनी आयशर मोटर्सने रॉयल एनफिल्डचे अधिग्रहण केले. त्यामुळे आज रॉयल एनफिल्ड हा भारतीय कंपनीचा भाग आहे.

रॉयल एनफिल्डची स्थापना ब्रिटनमध्ये १९०१ मध्ये झाली होती. मात्र, भारतात या ब्रँडचे आगमन स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये झाले. त्या काळात भारतीय लष्कराला सीमेवर गस्त घालण्यासाठी मजबूत आणि विश्वासार्ह बाइकची गरज होती. यासाठी भारतीय लष्कर आणि सरकारने रॉयल एनफिल्डच्या ईींश्रश्रशीं ३५०ची निवड केली. त्यावेळी कंपनीला ८०० मोटरसायकलींची पहिली ऑर्डर देण्यात आली. त्यानंतर भारतीय लष्कराच्या ताफ्यात बुलेटचा समावेश झाला आणि या मोटरसायकलची लोकप्रियता वाढू लागली.

भारतामध्ये बुलेटची मागणी वाढत असल्याने ती पूर्ण करण्यासाठी रॉयल एनफिल्डने १९५५ मध्ये मद्रास मोटर्ससोबत करार केला. या करारानुसार दोन्ही कंपन्यांनी मिळून 'एनफिल्ड इंडिया' नावाची कंपनी स्थापन केली आणि भारतातच मोटरसायकलचे उत्पादन सुरू केले.

रॉयल एनफिल्ड आणि मद्रास मोटर्समधील करारानंतर भारतात बुलेटच्या उत्पादनाला सुरुवात झाली. यासाठी तमिळनाडूमधील तिरुवोट्टियूर येथे कारखाना उभारण्यात आला. सुरुवातीच्या काळात बाइकचे अनेक सुटे भाग ब्रिटनमधून भारतात आणले जात होते आणि त्यांची येथे असेंबलिंग केली जात होती. मात्र, १९६०च्या दशकापर्यंत बुलेटचे सर्व भाग भारतातच तयार होऊ लागले.

भारतामध्ये बुलेटची लोकप्रियता वाढत असताना ब्रिटनमध्ये मात्र रॉयल एनफिल्डची परिस्थिती खालावत गेली. केमवर आणि धरारहर यांसारख्या जपानी ब्रँड्सचा बाजारात उदय झाला. हलक्या आणि तुलनेने स्वस्त मोटरसायकलींमुळे रॉयल एनफिल्डसमोर मोठे आव्हान निर्माण झाले. परिणामी, ब्रिटनमधील रॉयल एनफिल्डचा कारखाना १९७० मध्ये पूर्णपणे बंद झाला. मात्र, भारतात बुलेटचा प्रवास सुरूच राहिला. भारतातही कंपनीच्या व्यवसायाला काही काळ अडचणींचा सामना करावा लागला. त्यानंतर १९९४ मध्ये आयशर मोटर्सने रॉयल एनफिल्डचे अधिग्रहण केले.

२००० मध्ये सिद्धार्थ लाल यांनी कंपनीची जबाबदारी स्वीकारल्यानंतर रॉयल एनफिल्डच्या प्रवासाला नवे वळण मिळाले. कंपनीने बुलेट आणि इतर बाइक्सच्या माध्यमातून भारतीय बाजारात पुन्हा आपली मजबूत पकड निर्माण केली. काळानुसार बाइकच्या डिझाइन आणि तंत्रज्ञानात बदल झाले, मात्र रॉयल एनफिल्डची क्लासिक ओळख आणि बुलेटचा दमदार लूक कायम राहिला.

आज रॉयल एनफिल्ड हा भारतातील सर्वात जुन्या आणि लोकप्रिय मोटरसायकल ब्रँडपैकी एक आहे. ब्रिटनमध्ये जन्मलेला हा ब्रँड भारतात रुजला, भारतीय कंपनीचा भाग बनला आणि आज जगभरात भारतीय मोटरसायकल ब्रँडची ओळख निर्माण करत आहे.

# ''...म्हणून आम्ही मूळ शिवसेनेवर दावा केला''; शिंदेसेनेच्या ज्येष्ठ वकिलाचा कोर्टात मोठा युक्तिवाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटालाच 'खरी शिवसेना' म्हणून मान्यता देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे गटाकडून सुप्रीम कोर्टात आव्हान दिले होते. या प्रकरणी कोर्टात सुनावणी सुरू केली आहे. हे प्रकरण पक्षावरील नियंत्रण आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह यांच्याशी संबंधित आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर, ज्यात न्यायमूर्ती जयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांचाही समावेश आहे, तिथे या प्रकरणावर सुनावणी आज सुनावणी होतेय. यावेळी शिंदेचे वकील नीरज कौल यांनी अंतिम युक्तिवादाला सुरुवात केली.

शिंदेसेनेचे ज्येष्ठ वकील नीरज कौल म्हणाले की, निवडणूक आयोगाने पक्षाच्या घटनेची तपासणी करण्याचे अधिकार क्षेत्र स्वतःहून निर्माण केले, जे यापूर्वी अस्तित्वात नव्हते. १९९४ पासून विविध आदेशांद्वे आणि पत्रव्यवहाराद्वे निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना त्यांच्या पक्षाच्या घटना लोकशाहीवादी असाव्यात असं सूचित केले. जर पक्षात एकतर्फी कारभार किंवा मनमानी असेल तर बहुमताचा निर्णय कसा घ्यायचा? पक्षात निवडणुका होणे आवश्यक आहे आणि केवळ १-२ सदस्यांनी बहुसंख्य सदस्यांची नियुक्ती करणे योग्य नाही असं निवडणूक आयोगाने यापूर्वीच स्पष्ट केले होते. पक्षाच्या घटना लोकशाही तत्त्वांवर आधारित आहेत हे पक्षांनी सुनिश्चित केले पाहिजे. एका टप्प्यावर शिवसेनेत असं म्हटलं होते, आमच्या घटनेत निवडणुकांची तरतूद नाही. त्यानंतर निवडणूक आयोगाने शिवसेनेचे प्रबोधन केले आणि मग पक्षाच्या घटनेत सुधारणा करण्यात आली असं त्यांनी सांगितले.

त्यानंतर २०१८ साली एक नवीन घटना समोर आली. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार १९९९ मध्ये जी लोकशाहीवादी घटना स्वीकारली गेली होती, तिचे स्वरूप या नवीन घटनेमुळे पूर्णपणे कसे बदलले हा महत्त्वाचा प्रश्न आहे. निवडणूक आयोगाला आम्ही २०१८ च्या घटनेबाबत कळवलं होते असा समोरच्यांचा बचाव आहे परंतु निवडणूक आयोगाने स्पष्टपणे आमच्याकडे २०१८ ची घटना उपलब्ध नाही असं म्हटलं आहे. सुभाष देसाई यांच्या म्हणण्यानुसार विधानसभा अध्यक्षही केवळ निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या पक्षाच्या घटनेचाच विचार करतील. ते एका पत्राचा आधार घेत आहेत ज्यामध्ये काही निवडणुका झाल्याचा उल्लेख आहे परंतु त्या पत्रासोबत २०१८ ची घटना जोडली गेली होती, असे दर्शवणारा कोणताही पुरावा त्यात नाही असा दावा नीरज कौल यांनी कोर्टासमोर केला.

दरम्यान, ठाकरेंच्या वकिलांकडून करण्यात आलेले हे दावे पूर्णपणे निराधार आहेत. आमच्यावर केवळ एवढाच आरोप केला जात आहे की, २०१८ च्या घटनेत नमूद केलेल्या पदांपैकी एका पदावर आम्हीही काम केले होते. हा मुद्दा 'एस्टॉपेल'चा (म्हणजेच पूर्वीच्या कृतीमुळे आता वेगळी भूमिका घेण्यास प्रतिबंध असण्याचा) नाही, तर बहुमत कोणाकडे आहे हे निश्चित करण्याच्या निवडणूक आयोगाच्या अधिकाराशी संबंधित आहे असं नीरज कौल यांनी कोर्टाच्या निदर्शनास आणले. ''निवडणूक आयोगाने घटनापीठाचे उल्लंघन केले असं म्हणता येणार नाही''

विधिमंडळ पक्षाचा विचार केला जाऊ शकत नाही, असे म्हणणे चुकीचे आहे. 'चिन्ह आदेशा'नुसार एखाद्या राजकीय पक्षाला चिन्ह मिळण्यासाठी त्यांना मिळालेल्या जागा आणि मते हे महत्त्वाचे निकष असतात असे 'सुभाष देसाई' खटल्यातील निकालात म्हटले आहे. परिच्छेद १५ अन्वये हा एक संबंधित निकष असल्याचे त्यात नमूद केले आहे. 'सुभाष देसाई' खटल्यातील संपूर्ण चर्चा ही 'व्हीप' कोण नियुक्त करते या संदर्भात होती. विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष यांची गल्लत करता येणार नाही असं त्या संदर्भातच म्हटले गेले होते. मतांचे प्रमाण आणि विधिमंडळातील बहुमत यांचे महत्त्व घटनापीठाने मान्य केले होते. त्यामुळे या गोष्टी पूर्णपणे वगळल्या गेल्या किंवा त्याकडे दुर्लक्ष केले गेले असे म्हणणे चुकीचे ठरेल. ज्या दिवशी निवडणूक आयोगाचा आदेश आला, त्या दिवशी 'सुभाष देसाई' खटल्यातील निकाल आलेला नव्हता. त्यामुळे निवडणूक आयोगाने घटनापीठाच्या निकालाचे उल्लंघन केले असे म्हणता येणार नाही. प्रकरणातील वस्तुस्थिती लक्षात घेऊन आपल्या विवेकाने योग्य तो निकष निश्चित करा असं 'सुभाष देसाई' खटल्यातील अनेक परिच्छेदांमध्ये असे म्हटले आहे.